# निवेदन

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेबरोबरच मराठी ही या राज्याची शासनव्यवहाराची भाषा राहील हे धोरण शासनाने जाहीर केले आणि राज्यकारभाराच्या भाषेतील हा बदल सुकरतेने, योजनाबद्धतेने व निश्चित कालावधीत घडवून आणण्याची जबाबदारी भाषा संचालनालयावर सोपवण्यात आली. ही जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीने भाषा सल्लागार मंडळाच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली भाषा संचालनालयाने जे अनेक प्रकल्प हाती घेतले त्यांत आजच्या शासनव्यवहाराच्या भाषाविषयक गरजा भागवू शकेल असा एक परिपूर्ण "शासन व्यवहार कोश" तयार करणे हा प्रमुख प्रकल्प होता. माध्यम परिवर्तनाची पायाभूत आवश्यकता म्हणून या प्रकल्पास अग्रक्रम देणे निकडीचे होते, हे खरे. परंतु प्रशासनिक माध्यमाचे मराठीकरण हे पायरीपायरीने व्हावे व हा बदल क्रमशः अंगवळणी पडावा म्हणून "पदनाम कोश", "प्रशासन वाक्प्रयोग", "प्रशासनिक लेखन" इत्यादी प्रकाशने आधी हाती घेण्यात आली व त्यातील प्रशासनोपयोगी परिभाषा वापरात आणण्यात आली.

मराठीकरणाची सुरुवात करता येईल व रोजच्या प्रशासनिक कामकाजासाठी सामान्यतः पुरेसा होईल एवढा शब्दसंग्रह वरील प्रकाशनांच्याद्वारे सिद्ध झाला होता. या आधारावरच पुढे भाषा सल्लागार मंडळाने विस्तृत प्रमाणावरील 'शासन व्यवहार कोशा'च्या शब्दसंकलनाचे व पर्यायनिश्चितीचे काम हाती घेतले व ते सुमारे दीड-दोन वर्षांच्या अवधीत पुरे केले. मुद्रितांच्या स्वरूपातील कोशाच्या पहिल्या खर्ड्याची पुनःसंस्करणाच्या दृष्टीने मंडळाने पुन्हा तपासणी केली. कोशाची व्याप्ती केवळ दैनंदिन शासनव्यवहारापुरतीच मर्यादित न ठेवता या क्षेत्राबाहेरील इतर संबंधित विषयांच्या व सामान्य व्यवहाराच्याही गरजा भागतील असे या शब्दसंग्रहाचे स्वरूप असावे या दृष्टीने वरील पुनर्वाचनाच्या वेळी कोशात पुष्कळशा नवीन शब्दांची भर घालण्यात आली व व्यवहारात रूढ होतील व वापरास सुलभ ठरतील अशा रीतीने आधी स्वीकारलेल्या पर्यायांतही सुधारणा करण्यात आली.

याच सुमारास शास्त्रीय व मानविकी विषयांच्या परिभाषा निश्चितीचे काम महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या सहकार्याने भाषा सल्लागार मंडळाकडे सोपवण्यात आले होते व विभिन्न विषयांसाठी तज्ञांच्या उपसमित्यांद्वारे या कामाची सुरुवातही झाली होती. शासन व्यवहार कोशाच्या पुनःसंस्करणाच्या वेळी त्यात अंतर्भूत असलेल्या थोड्याफार प्रमाणातील वरील विषयांशी संबद्ध अशा शब्दांचा, उपसमित्यांनी निश्चित केलेल्या पर्यायांच्या अनुरोधाने पुन्हा विचार करण्यात आला आणि योग्य त्या जागी पर्यायही बदलण्यात आले. या संदर्भात कोशातील विधिविषयक पर्यायांचा विशेषतः उल्लेख करण्यासारखा आहे.

हे काम पूर्ण झाल्यानंतर सुमारे तीस हजार शब्दसंख्या असलेल्या या कोशाची कच्ची प्रत पुस्तकरूपाने तयार करण्यात आली. या प्रती अवलोकनासाठी व त्यात सुधारणा सुचवण्यासाठी महाराष्ट्रातील नामवंत लेखक, भाषातज्ज्ञ, वृत्तपत्रकार, यांच्याकडे पाठवण्यात आल्या. तसेच शासनातील निरनिराळ्या विभागांकडे त्या पाठवून त्यांचे अभिप्रायही मागवण्यात आले. या कामाविषयी वरील व्यक्तींपैकी अनेकांनी आस्था व आत्मीयता दाखवून कोशाच्या स्वरूपाविषयी व उपयुक्ततेविषयी समाधान प्रकट केले व काही ठिकाणी पर्यायांचा व नवीन शब्दांचा समावेश करण्याच्या दृष्टीने सूचनाही केल्या. मंडळाने या सर्व सूचनांचा काळजीपूर्वक विचार केला व जरूर तेथे बदलही केले.

दरम्यानच्या काळात कोशाच्या कच्च्या प्रतीचा शासकीय कार्यालयातून व अन्यत्र जो वापर केला जात होता त्याद्वारे या शासन व्यवहार कोशातील पर्यायांस वापराच्या कसोटीवर पारखले जात होतेच. सोपेपणा व रूढता या दोन दृष्टिकोनातून कोशातील काही पर्यायांवर थोडयाफार प्रमाणात पूर्वी टीका झाली होती, परंतु सर्वार्थाने समर्पक ठरतील असे अन्य पर्याय उपलब्ध न झाल्यामुळे व कोशातील पर्यायांच्या सतत वापरामुळे आज ते सर्वत्र मान्य झाले आहेत आणि प्रशासनिक कामकाजासच नव्हे तर वृत्तपत्र लिखाणात व इतर लेखनातही त्यांना मान्यता मिळाली आहे.

या ठिकाणी महाराष्ट्र शासनाचे भूतपूर्व भाषा संचालक व मंडळाचे सदस्य-सचिव डॉ. वा. ना. पंडित व श्री. के. मा. आराध्ये यांचा नामोल्लेख करावा लागेल. पूर्वीच्या मध्यप्रदेश राज्याचे पहिले भाषा संचालक या नात्याने राज्याच्या भाषाकारणाचा प्रदीर्घ अनुभव डॉ. वा. ना. पंडित यांच्या गाठी होता. राज्याच्या प्रशासनिक माध्यम परिवर्तनाच्या बाबतीतील समस्यांची त्यांना यथार्थ जाणीव होती. प्रशासनात मराठी-करणाच्या दृष्टीने भाषा संचालनालयाने हाती घेतलेले पदनाम कोश, प्रशासन वाक्प्रयोग, प्रशासनिक लेखन आदी प्रकल्प आणि प्रस्तुत शासन व्यवहार कोशाच्या जडणघडणीचे कार्य त्यांच्याच स्फूर्तिदायक निदेशनाखाली पार पडले आहे. श्री. के. मा. आराध्ये यांनी शास्त्रशुद्ध कोशरचनेच्या दृष्टीने या कोशाची तपासणी करून त्याची मुद्रणासाठी अंतिम प्रत तयार केली. उपरोक्त सर्व प्रकल्पांना आज जे मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहे ते श्री. के. मा. आराध्ये यांच्या गाढ भाषा व्यासंगाचेच फळ होय.

कोश अंतिम स्वरूपात तयार झाल्यावर त्याचे मुद्रण निर्दोषपणे व कोणतीही त्रुटी वा उणीव न राहता होणे आवश्यक होते. या कामाशी संबंधित कर्मचाऱ्यांची व शासकीय मुद्रणालयाची ही जबाबदारी होती. हे काम सर्वतोपरी काळजी घेऊन पार पाडावयाचे असल्याने छपाईस थोडा अवधी लागणे अपरिहार्य होते. कोशाचे अंतिम मुद्रण पुणे येथील शासकीय फोटोझिंको मुद्रणालयाने केले आहे. निरनिराळ्या प्रकारच्या मुद्रांचा उपयोग करून कोशाचे बिनचूक मुद्रण करण्याचे काम देखील तांत्रिक

दृष्टया अत्यंत अवघड होते. शासकीय फोटोझिंको मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. घ. द. घोंड आणि संबंधित कर्मचारी यांनी आस्थेने कच्च्या सुधारित प्रतीची बिनचूक मुद्रिते काढून देऊन कोशाच्या प्रकाशनाच्या कामी आपला महत्त्वाचा वाटा उचलला आहे.

या कोशनिर्मितीच्या प्रकल्पासाठी श्री. य. रा. दाते हे प्रत्यक्ष कोशकारच अध्यक्ष म्हणून लाभले होते हे सुदैवच म्हटले पाहिजे. कोशाचे मुद्रण संपून त्याच्या प्रकाशनास थोडा अवधी उरला असतानाच ते कालवश झाले याचे दुःख वाटत आहे. त्यांची स्मृती भाषा संचालनालयास नेहमीच स्फूर्तिदायक ठरेल यात शंका नाही.

शासनातील सर्व स्तरावरील कर्मचाऱ्यांची सर्व प्रकारच्या शासकीय कामकाजाची गरज भागवू शकेल अशी मराठी परिभाषा या कोशाद्वारे आता उपलब्ध झाली आहे. शासनाबाहेरील इतर क्षेत्रातील व सामान्य व्यवहारातील परिभाषाविषयक गरजांसाठीही हा कोश उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

**वा. म. कुलकर्णी,**
भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.